# जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.

(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.)

**तात्काळ/महत्वाचे**

जा.क्र.२०२१/आ.व्य./को.वि.संचारबंदी/कावी- ४९०
दि.०७.०३.२०२१

**विषय: कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या संचारबंदी नंतर जिल्हयातील आस्थापना / दुकाने उघडण्यासाठी नियमावली लागू करणे तसेच रात्रीची संचारबंदी लागू करणेबाबत.**

**वाचा: १.आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार.**
**२.साथ रोग प्रतिबंध कायदा १८९७ नुसार.**
**३.फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ मधील तरतुदीनुसार.**
**४.या कार्यालयाचे आदेश क्र.२०२१/आ.व्य/को.वि.संचारबंदी/कावी-४७४ दि.२६.०२.२०२१.**
**५.या कार्यालयाचे आदेश क्र.२०२१/आ.व्य/को.वि.तपासण्या/कावी-४७८ दि.२८.०२.२०२१.**

**<u>आदेश</u>**

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हीड १९) नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी राज्यात तसेच जिल्हयात कोव्हीड-१९ बाधित रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने जिल्हयात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून संपूर्ण हिंगोली जिल्हयात संदर्भ क्र.४ नुसार हिंगोली जिल्हयात ७ दिवस संचारबंदी लागू करण्यात आली होती. त्यानुसार संचारबंदी नंतर जिल्हयातील आस्थापना / दुकाने नियम व अटी नुसार उघडण्यासाठी परवानगी देणे बाबत माझे मत झाले आहे.

त्याअर्थी मी रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली मला प्राप्त अधिकारा नुसार जिल्हयात संदर्भ क्र.४ नुसार लागू संचारबंदी नंतर जिल्हयातील आस्थापना / दुकाने दि.०८.०३.२०२१ रोजी पासून खालील नियम व अटी नुसार उघडण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे. परंतु रात्रीची संचारबंदी जिल्हयात लागू असेल. सदर रात्रीची संचारबंदी सायंकाळी ७.०० ते सकाळी ७.०० या कालावधीत लागू असेल.

**प्रतिबंधमुक्त:**

१. जिल्हयातील सर्व किराणा, कृषी उत्पन्न बाजार समिती, कृषी दुकाने सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.०० या कालावधीत उघडण्यास परवानगी असेल. परंतु याकरिता संबंधित व्यापारी / दुकानदार व त्यांच्या इथे काम करणारे कर्मचारी यांच्या कडे कोरोना Antigen चाचणी अहवाल Negative असल्याचे चालू कालावधीतील प्रमाणपत्र बंधनकारक असेल.

२. जिल्हयातील सर्व भाजीपाला विक्री, फळ विक्री, मांस / मच्छी / मटन विक्री, दारू विक्री दुकाने सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या कालावधीत उघडण्यास परवानगी असेल. परंतु याकरिता संबंधित व्यापारी / दुकानदार व त्यांच्या इथे काम करणारे कर्मचारी यांच्या कडे कोरोना Antigen चाचणी अहवाल Negative असल्याचे चालू कालावधीतील प्रमाणपत्र बंधनकारक असेल.

३. जिल्हयातील दुध विक्री दुकाने (दूध डेअरी) सकाळी ७.०० ते सकाळी १०.०० व सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० याकालावधीत चालू राहतील. परंतु याकरिता संबंधित व्यापारी / दुकानदार व त्यांच्या इथे काम करणारे कर्मचारी यांच्या कडे कोरोना Antigen चाचणी अहवाल Negative असल्याचे चालू कालावधीतील प्रमाणपत्र बंधनकारक असेल.

४. जिल्हयातील सर्व मेडिकल (औषधी दुकाने) यांना सकाळी ९.०० ते रात्री ९.०० याकालावधीत तसेच आवश्यकतेनुसार उघडण्यास परवानगी असेल.

५. जिल्हयातील बँका नागरिकांसाठी केवळ सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या कालावधीत चालू राहतील. परंतु शासकीय कामकाजासाठी बँका त्यांच्या कार्यालयीन वेळे प्रमाणे चालू राहतील.

६. MSRTC बसेस पूर्ण क्षमतेने वाहतूक करण्यास परवानगी असेल. परंतु बाहेर जिल्हयातून येणाऱ्या बसेस शासकीय बसस्थानका शिवाय इतर कोठेही थांबवण्यास परवानगी नसेल.

७. MSRTC बस स्थानकात चालू असलेले कोरोना Antigne तपासणी कॅम्प पुढील आदेशापर्यंत चालू राहतील. तसेच रेल्वे स्थानकात आरोग्य विभामार्फत कोरोना Antigne तपासणी कॅम्प उभारण्यात यावा.
८. ऑटोरिक्षा वाहतूकीस केवळ २+१ (२ प्रवासी व १ चालक) अशी परवानगी असेल, जीप व त्या प्रकारातील वाहतूकीस केवळ ५+१ (५ प्रवासी व १ चालक) अशी परवानगी असेल, खाजगी कार वाहनास केवळ ३+१ (३ प्रवासी व १ चालक) अशी परवानगी असेल व दोनचाकी वाहनावर केवळ एका व्यक्तीस प्रवास करण्यास परवानगी असेल.
९. जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालये पूर्ण वेळ चालू राहतील.
१०. जिल्हयातील सर्व खाजगी कार्यालये १०.०० ते सायंकाळी ७.०० याकालावधीत उघडण्यास परवानगी असेल.
११. लग्न व लग्न संबंधित कार्यक्रमांना केवळ ५० व्यक्तींना परवानगी असेल. (वधू व वर पक्षातील सदस्यांच्या समावेशासह ५० व्यक्तींच्या मर्यादेत). सदर लग्न समारंभ मोकळ्या जागेत करण्यात यावेत. परंतु लग्न समारंभाकरिता संबंधित उपविभागीय अधिकारी कार्यालयाची परवानगी घेणे अनिवार्य असेल.
१२. अंत्ययात्रेस केवळ २० व्यक्तींना परवानगी असेल. यासाठी वेगळ्याने परवानगी घेण्याची गरज राहणार नाही.
१३. वरीलप्रमाणे परवानगी देण्यात आलेल्या आस्थापना / दुकाना व्यतिरिक्त इतर कोणासही त्यांची दुकाने / आस्थापना उघडण्यास परवानगी नसेल.

**प्रतिबंधित:**

१. जिल्हयातील शाळा, महाविद्यालये, चित्रपटगृहे, लॉन्स, मंगल कार्यालये, जलतरण तलाव इत्यादींना उघडण्यास परवानगी नसेल.
२. जिल्हयातील रेस्टॉरंट, हॉटेल्स, बियर आणि वाईन बार इत्यादींना उघडण्यास परवानगी नसेल. परंतु रेस्टॉरंट आणि हॉटेल्स यांना केवळ पार्सल सुविधेसाठी सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.०० या कालावधी करिता उघडण्यास परवानगी असेल.
३. जिल्हयातील सर्व धार्मिक / प्रार्थना स्थळे नागरिकांसाठी बंद राहतील.
४. जिल्हयातील सर्व धार्मिक, राजकीय, सामाजिक कार्यक्रमांना व मिरवणुकांना बंदी असेल.
५. जिल्हयात धरणे, आंदोलने, प्रदर्शने इत्यादी करण्यासाठी बंदी असेल.
६. वरीलप्रमाणे प्रतिबंधित करण्यात आलेली ठिकाणे या कार्यालयाच्या पुढील आदेशापर्यंत बंद राहतील.

वरीलप्रमाणे आदेश दि.०७.०३.२०२१ रोजी निर्गमित करण्यात येत आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., जिल्हा पोलीस अधीक्षक, सर्व उपविभागीय अधिकारी तसेच सर्व संबंधित अधिकारी यांची असेल. सदर आदेशाची आवज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, साथरोग प्रतिबंध कायदा १८९७, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अंतर्गत संबंधितावर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(रुचेश जयवंशी, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

**प्रतिलिपी:**

**१.** मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव.
**२.** मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
**३.** पोलीस अधीक्षक, हिंगोली. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
**४.** उपविभागीय अधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
**५.** तहसीलदार हिंगोली/कळमनुरी/वसमत/सेनगाव/औंढा ना. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
**६.** मुख्याधिकारी न.प./न.पं.हिंगोली/कळमनुरी/वसमत/सेनगाव/औंढा ना. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
**७.** सर्व संबंधीत शासकीय विभाग प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
**८.** जिल्हा माहिती अधिकारी हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

**(रुचेश जयवंशी, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**